# पपई

**पिकाचे नाव:** पपई
**शास्त्रीय नाव:** कैरीका पपाया
**कुळ:** कैरीकेसी
**लागवड दिनांक:** 04/08/2023
**लागवड अंतर :** 8 x 7 फूट
**लागवडीचे एकूण क्षेत्र:** 26.5 R
**रोपांची संख्या:** 377

**वाण:** तैवान 786/रेड लेडी, 15 नंबर, रेड बेबी, वेलकम 46, आइस बेरी, ग्रीन बेरी, रुबी रेड
पपई पिकाचे वैशिष्ट्य: पपई हे अतिशय गोड पोष्टिक फळ आहे. व्हिटॅमिन ए (2020 IU/100gm), व्हिटॅमिन सी (85 mg/100gm), प्रथिने, कार्बोहायड्रेट्सने युक्त असलेले हे फळ परसबागेतील फळ म्हणून ओळखले जाते, उत्पादनाच्या द्रुष्टीने जागतिक स्थरावर भारत देश हा अग्रेसर आहे. पपई ही एक बहुपत्नी वनस्पती आहे ज्यामध्ये नर, मादी आणि उभयलिंगी वनस्पती आढळतात.
**तैवानचे वैशिष्ट्य:** तैवान 786 ह्या जातीच्या फळाची साल हि जाड असल्याने ह्या जातीच्या फळाची टिकवण क्षमता जास्त आहे. अतिशय चांगले उत्पन्न देणारी, चवीला गोड अशी जात म्हणून बाजारपेठेसाठी पसंत केली जाते. ही जात विषाणूजण्य रोगाला बळी पडताना दिसत आहे.
**माती:** हलकी ते मध्यम, काळी, पाण्याचा चांगला निचरा होणारी सुपीक जमीन, जिचा सामू 6.5-7.0 एवढा असलेली, सेंद्रिय पदार्थांनी भरपूर असलेली जमीन पपई लागवडीसाठी निवडावी. पाणथळ, पण्याचा निचरा न होणारी जमीन लागवडी साठी टाळावी.
हवामान: पपई ही उष्णकटिबंधीय, दिवस उदासीन (Day Neutral) आणि तापमानास संवेदनशील वनस्पती आहे. पिकाच्या वाढीसाठी 22-26° C तापमान आवश्यक आहे. फुल धारणे दरम्यान जास्त तापमानामुळे वांझपणा येतो. थंडी पाणथळ जमीन आणि जोरदार वारा यासाठी पपई पिक अतिशय संवेदनशील आहे. लागवडी साठी वार्षिक पर्जन्यमान 150-180 सेमी असायला हवे.
**उत्पादन:** लागवडीनंतर 7-8 महिन्यांनी उत्पादन सुरु होते, सरासरी 40 किलो /झाड
कीटक: पिठ्या ढेकूण, फळमाशी, तुडतुडे, मावा, लाल कोळी, पांढरी माशी.
रोग: चुरडामूरडा, पपई मोझॅक व्हायरस, रिंग स्पॉट व्हायरस, मुळकुज, खोडकुज, भुरी, केवडा.

